# Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar

## Date – 16 February 2025

## Time 18.10 to 18.20

## Language Marathi

## आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर

## प्रादेशिक बातम्या

## दिनांक – १६ फेब्रुवारी २०२५ सायंकाळी ६.१०

****

- भारत टेक्स एक्स्पोमध्ये परंपरेसोबत विकसित भारताचं दर्शन होत असल्याचं, पंतप्रधानांचं प्रतिपादन
- नवी दिल्ली स्थानकावर काल रात्री झालेल्या चेंगराचेंगरीच्या घटनेची चौकशी करण्यासाठी उच्चस्तरीय समिती स्थापन
- राज्यातल्या प्रत्येक शाळेला मराठी विषय शिकवणं सक्तीचं करण्यात आल्याची मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची माहिती
- शिवजयंती निमित्त छत्रपती संभाजीनगर शहरात विविध कार्यक्रमांना सुरुवात

आणि

- नांदेडहून आयोध्येला जात असलेल्या भाविकांच्या टेम्पो ट्रॅव्हलरच्या अपघातात चार जणांचा मृत्यू

****

भारत टेक्स एक्स्पोमध्ये परंपरेसोबत विकसित भारताचं दर्शन होत असल्याचं, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी म्हटलं आहे. नवी दिल्लीत आज भारत मंडपम् इथं भारत टेक्स २०२५ या वस्त्रोद्योग मेळाव्यात ते बोलत होते. हे जागतिक वस्त्रोद्योग संमेलन असून, यामुळे वस्त्रोद्योग क्षेत्रात गुंतवणूक आणि निर्यातीला चालना मिळत आहे, तसंच यामधून भारताच्या सांस्कृतिक विविधतेचं दर्शन होत असल्याचं पंतप्रधान म्हणाले.

भारत टेक्स हे आंतरराष्ट्रीय पातळीवरचं भव्य वस्त्रोद्योग प्रदर्शन असून, ते उद्यापर्यंत सुरू राहणार आहे. यामध्ये कच्च्या मालापासून ते तयार उत्पादनांपर्यंत विविध उत्पादनं आणि यंत्रसामुग्रीचा समावेश आहे.

****

नवी दिल्ली स्थानकावर काल रात्री झालेल्या चेंगराचेंगरीच्या घटनेची चौकशी करण्यासाठी उच्चस्तरीय समिती स्थापन करण्यात आली आहे. या समितीत उत्तर रेल्वेचे मुख्य वाणिज्य व्यवस्थापक नरसिंह देव आणि मुख्य सुरक्षा आयुक्त पंकज गंगावार यांचा समावेश आहे. या समितीने स्थानकावरचे सीसीटीव्ही फूटेज राखून ठेवायचे निर्देश दिले आहेत.

दरम्यान, या घटनेत १८ जणांचा मृत्यू झाला, तर काही जण जखमी झाले. फलाट क्रमांक १४ आणि १५ वर उतरण्यासाठी असलेल्या पुलावरुन उतरताना काहीजण घसरले त्यामुळे गर्दीतली माणसं एकमेकांवर कोसळल्यामुळे चेंगराचेंगरी झाल्याचं, उत्तर रेल्वेच्या मुख्य जनसंपर्क अधिकाऱ्यांनी सांगितलं.

****

दरम्यान, नवी दिल्ली रेल्वे स्थानकावरच्या दुर्घटनेची जबाबदारी स्वीकारुन रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांनी राजीनामा द्यावा, अशी मागणी, काँग्रेसनं केली आहे. काँग्रेसच्या पक्ष प्रवक्ता सुप्रिया श्रीनेत यांनी आज नवी दिल्लीत यासंदर्भात पत्रकार परिषद घेतली. दुर्घटनेच्या आधी तासाभरात पंधराशेहून अधिक तिकिटं विकली गेली होती, त्यामुळे रेल्वेला गर्दीचा अंदाज यायला हवा होता, असं त्या म्हणाल्या.

****

नवी दिल्ली रेल्वे स्थानकावर झालेल्या दुर्घटनेची बातमी दुःखद आणि वेदनादायक आहे, अशा शब्दात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दुःख व्यक्त केलं आहे. महाकुंभातून आणलेल्या गंगाजलाचा लाभ घेण्यासाठी नागपूरमधे आयोजित कार्यक्रमानंतर ते आज वार्ताहरांशी बोलत होते. यावेळी त्यांनी लव जिहाद वर मत व्यक्त केलं. एका धर्माच्या व्यक्तीने दुसऱ्या धर्माच्या व्यक्तीशी लग्न करणे गैर नाही, मात्र यात फसवणुकीचे प्रकार वाढत असून, त्याच्यावर कारवाई करणं आवश्यक असल्याचं मत त्यांनी व्यक्त केलं.

दरम्यान, जळगाव इथं एका कार्यक्रमासाठी आले असता, मुख्यमंत्र्यांनी, राज्यातल्या प्रत्येक शाळेला मराठी विषय शिकवणं सक्तीचं करण्यात आल्याचं सांगितलं. ते म्हणाले –

> ***कुठलीही मराठी शाळा बंद होणार नाही. यासंदर्भात सातत्याने आम्ही निर्देश दिलेले आहेत. दुसरं शाळा हिंदी असो, इंग्रजी असो, कुठलीही असो, त्यांना मराठी शिकवावी लागेल, याची आपण सक्ती केलेली***

*आहे. ती सक्ती ते योग्य प्रकारे पालन करताहेत की नाही याच्याकडे आपलं पूर्ण लक्ष आहे. यासंदर्भातली यंत्रणा आपण उभी करतो आहोत. त्यामुळे कुठल्याही शाळेला मराठी हे शिकवावंच लागेल अशा प्रकारचा आपला निर्णय आहे.*

****

परीक्षा पे चर्चा कार्यक्रमाच्या आजच्या भागात अभिनेता विक्रांत मेस्सी आणि अभिनेत्री भूमी पेडणेकर यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केलं. विद्यार्थ्यांनी चिंतामुक्त परीक्षा देण्यासाठी चांगला आराम करावा, नेहमी स्वतःमध्ये प्रगती करण्याचा प्रयत्न करत राहावा आणि केवळ उत्तीर्ण होण्यासाठी नाही तर ज्ञान प्राप्त करण्यासाठी अभ्यास करा असा सल्ला, विक्रांत मेस्सी यानं दिला. त्यांनी पालकांना मुंलामुलांमध्ये स्पर्धा न करण्याचा, तसंच मुलांवर आपल्या अपेक्षा लादू नये, असं आवाहन केलं. तर आपल्याला भविष्यात काय करायचं याबद्दल मुलांनी आपल्या पालकांना विश्वासात घेऊन सांगावं आणि ते पूर्ण करून दाखवावं, असं भूमी पेडणेकर यांनी सांगितलं.

*उन पॅरेंटस् को भी कहना चाहुंगा की जो एक्सपेक्टेशन्स आपने अपने बच्चों पे डाली है, वो बर्डन जिस दिन लगने लगती है ना, तो दे आर नॉट एबल टू ग्रो। और प्रधानमंत्री श्री मोदीजी भी ये कहते है की, आपके सपने जो है, वो आपके है, आपके बच्चों के नही।*

*मेरे मम्मी पापा चाहते थे की, मै एक डिफरंट करीअर पार्ट चुनूं। और तब मैने अपने तरीके से उनको एक पॉझिटीव्ह चीज दिखानी शुरू की एक्टींग की दुनिया पॉझिटीव्ह है। ये इतनी आपको घबराने की जरूरत नही है।*

****

केंद्र सरकारच्या नेहरू युवा केंद्राचा 'मेरा युवा भारत' उपक्रम जळगाव इथं सुरू आहे. या उपक्रमाअंतर्गत आंतरजिल्हा युवा आदानप्रदान कार्यक्रमात मुंबईतल्या २७ युवक युवतींचा समावेश आहे. राज्यमंत्री रक्षा खडसे यांनी आज या युवकांशी संवाद साधत जळगावच्या सांस्कृतिक, ऐतिहासिक आणि कृषि परंपरेची माहिती दिली.

****

शिवजयंती निमित्त छत्रपती संभाजीनगर शहरात विविध कार्यक्रमांना आजपासून सुरुवात झाली. यात शहरातल्या सर्व पुतळ्यांची साफसफाई जिल्हा शिवजयंती महोत्सव समितीच्या वतीने करण्यात आली, तसंच सायकल रॅलीमध्ये देखील मोठ्या प्रमाणात युवकांसह नागरिकांनी सहभाग घेतला. यावेळी सायकल रॅली मधून आरोग्य जनजागृती करण्यात येत आहे. शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या वतीने क्रांती चौकात शिवकालीन शस्त्र प्रदर्शन भरवण्यात आलं आहे. यानिमित्त शिवकालीन शस्त्र आणि संस्कृती तसंच त्यांनी केलेली युद्धनीती याबद्दल आबालवृद्धांना माहिती होत आहे.

****

नांदेडहून अयोध्येला दर्शनासाठी जात असलेल्या भाविकांच्या टेम्पो ट्रॅव्हलरचा उत्तर प्रदेशातल्या बाराबंकी जिल्ह्यात लोणीकटरा इथं अपघात होऊन, चार जणांचा मृत्यू झाला, तर १६ जण जखमी झाले. आज पहाटेच्या सुमारास या टेम्पो ट्रॅव्हलरने रस्त्याच्या कडेला नादुरुस्त असलेल्या एका बसला धडक देऊन हा अपघात झाला. मृतांमधले तिघे जण नांदेड इथले, तर एक जण हिंगोली इथले रहिवासी होते.

****

छत्रपती संभाजीनगर इथं साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांचा पूर्णाकृती पुतळा आणि परिसर सुशिभिकरणाच्या कामाचं भुमिपूजन आज पालकमंत्री संजय शिरसाट यांच्या हस्ते झालं. इतर मागासवर्ग कल्याण आणि दुग्धविकास मंत्री अतुल सावे, मनपा आयुक्त तथा प्रशासक जी. श्रीकांत यावेळी उपस्थित होते. साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांचं उत्तम स्मारक आणि सर्वोपयोगी अद्यावत सभागृह, यासारख्या कामांसाठी आम्ही सर्व लोकप्रतिनिधी एकविचाराने आवश्यक निधी उपलब्ध करुन देऊ, असं आश्वासन शिरसाट यांनी यावेळी दिलं.

****

नाशिक महापालिकेने २०२५-२६ या आर्थिक वर्षासाठी तीन हजार ५४ कोटी ७० लाख रुपयांचं अंदाजपत्रक स्थायी समितीला आज सादर केलं. अत्यल्प करवाढ वगळता गेल्यावर्षीच्या अर्थसंकल्पाच्या तुलनेत ५०० कोटी रुपयांची वाढ करण्यात आली आहे. दोन वर्षांनी सिंहस्थ कुंभमेळा होत असून, पायाभूत सुविधा उभारण्यासाठी कर्ज उचलण्याऐवजी महापालिकेने दोनशे कोटींच्या ठेवी मोडण्याचा निर्णय घेतला आहे. कुंभमेळ्यासाठी शासन आराखड्यात मंजूर नसलेली कामं परंतू

सिंहस्थाच्या दृष्टीने आवश्यक आणि पूरक असणाऱ्या कामासाठी टोकन म्हणून पाच कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे.

****

छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात कसाबकेडा इथल्या आयुष्मान आरोग्य मंदिराची राज्यस्तरावर निवड करण्यात आली आहे. विविध अधिकाऱ्यांनी पाहणी करून या केंद्राचं उत्कृष्ट कामकाज दिसून आल्यामुळे, ही निवड करण्यात आली.

****

नांदेड इथं रेल्वेमार्ग विस्तारीकरणाच्या कामांमुळे उद्या १७ फेब्रुवारीपासून येत्या तीन मार्च पर्यंतच्या १५ दिवसांच्या कालावधीत काही रेल्वेगाड्या काही दिवशी रद्द करण्यात आल्या आहेत. परभणी–नांदेड एक्स्प्रेस १९, २०, २२, २३, २६, २७ फेब्रुवारी तसंच एक आणि दोन मार्च या दिवशी रद्द करण्यात आली आहे. तर नांदेड – औरंगाबाद एक्स्प्रेस २१ आणि २८ फेब्रुवारी रोजी रद्द करण्यात आली आहे. प्रवाशांनी आवश्यक पायाभूत सुविधांच्या सुधारणेसाठी सहकार्य करण्याचं आवाहन, दक्षिण मध्य रेल्वेनं केलं आहे.

****

छत्रपती संभाजीनगर नजिक वाळूज इथल्या श्रीनाथ कॉलेज ऑफ फार्मसी, हायटेक महाविद्यालय परिसरात पंडीत दीनदयाल उपाध्याय रोजगार मेळावा आयोजित करण्यात आला होता. या मेळाव्यात ४७९ उमेदवारांची निवड करण्यात आल्याची माहिती, जिल्हा कौशल्य विकास, रोजगार आणि उद्योजकता मार्गदर्शन केंद्राच्या सहायक आयुक्तांनी दिली.

****

धाराशिव जिल्ह्यात कळंब तालुक्यातल्या खामसवाडी शिवारात अवैध गांजाच्या झाडाची लागवड करुन संवर्धन करणाऱ्या शेतकऱ्यावर पोलीसांनी कारवाई केली. संभाजी हिलकुटे असं या शेतकऱ्याचं नाव असून, त्याच्या शेतातून एकूण ३४७ किलो २८० ग्रॅम वजनाची गांजाची झाडं ताब्यात घेण्यात आली.

****

उजनी धरणातून सोलापूर शहराला पिण्यासाठी तसंच सांगोला, मंगळवेढा, पंढरपूर नगरपालिका आणि नदीकाठच्या ग्रामपंचायतींना पिण्याच्या पाण्यासाठी उद्या भीमा नदीतून पाणी सोडलं जाणार आहे. सुरुवातीला सोळाशे घनफूट प्रतिसेकंद वेगानं, त्यानंतर सहा हजार घनफूट प्रति सेकंद वेगानं हे पाणी सोडलं जाणार आहे.